ePaper
# अवकाळीमुळे पिकांची नासाडी, 25 जिल्ह्यांना फटका!

| वर्ष - 6 | अंक - 331 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- पुणे जिल्ह्यात भाजप खांदेपालट करणार!
- वीज समस्यांसाठी उपमुख्यमंत्र्यांना साकडे!
- राज्यात टाईमपास सरकार
- चीनचे राष्ट्रपती रशिया-युक्रेन युद्ध संपवणार?

www.mahaenews.com | मंगळवार, दि. 21 मार्च 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# शस्तीमाफीचा "इफेक्ट"!

## करदात्यांच्या उत्साह : महापालिका उत्पन्न वाढले

। पिंपरी। महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील अवैध बांधकामांना शास्ती कर माफ करण्यात आला आहे. त्यामुळे मूळ कर भरणाऱ्या नागरिकांची संख्या वाढली असून, सात हजार ७४२ नागरिकांचा तब्बल १४३ कोटी ६३ लाख रुपयांचा शास्तीकर माफ झाला. त्यामुळे अनेक वर्षांपासून शास्तीसाठी थकलेला कर जमा झाल्याने महापालिकेच्या उत्पन्नातही ५३ कोटींची भर पडली आहे.**







शासनाकडून यापूर्वी १ हजार चौरस फुटांपर्यंतच्या निवासी बांधकामांचा शंभर टक्के शास्ती माफ झाला. त्याचा सर्वाधिक ६६ हजार ८३ बांधकामांना लाभ झाला. त्यानंतर १ ते २ हजार चौरस फुटांपर्यंतच्या बांधकामांना ५० टक्के शास्ती माफी दिली. शासनाने यावेळी घेतलेल्या निर्णयामुळे निवासी बिगरनिवासी सर्वच बांधकामांना शास्ती माफी मिळाली आहे. यामध्ये एकूण ३१ हजार ६१६ अवैध बांधकामांचा एकूण ४६० कोटी रुपयांचा शास्ती कर पूर्णपणे माफ झाला आहे. शास्ती कर माफ होणार असल्याने मूळ कराचा भरणा करून शास्ती कर माफ करून घेणाऱ्या नागरिकांची संख्या वाढली आहे.

आतापर्यंत सात हजार ७४२ नागरिकांनी मूळ कराचा भरणा केला आहे. त्यांनी ५३ कोटी १० व लाख ८४ हजार ३१६ रुपये मूळ कर भरला आहे, तर मूळ कराचा भरणा केल्याने १४३ कोटी ६३ लाख ८९ हजार ३५० रुपये अवैध शास्ती कर माफ झाला आहे.

> “शास्ती कर माफ झाल्यामुळे नागरिकांनी मूळ कर भरण्यास सुरुवात केली. त्याचे प्रमाणपत्रदेखील विभागाच्या वतीने ऑनलाइन उपलब्ध करून दिले जात आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी आपल्या मूळ कराचा भरणा करून शास्ती माफीचे प्रमाणपत्र काढून घ्यावे.
> – नीलेश देशमुख, सहायक आयुक्त, कर संकलन विभाग

# रेड झोनमधील एनओसी आदेशाला स्थगिती!

## १० मीटर अंतरावरील फाईलच लष्कराकडे जाणार

। पिंपरी। महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

लष्करी विभागाच्या आस्थापनेपासून १० ऐवजी ५० मीटर अंतराच्या परिघातील बांधकामांना स्थानिक लष्करी विभागाकडून ना हरकत प्रमाणपत्र (एनओसी) घेण्याची सक्ती करण्यात आली होती. तो नियम नुकताच स्थगित करण्यात आला आहे. त्यामुळे पूर्वीप्रमाणेच १० मीटर अंतराच्या परिघातील बांधकामांच्या फाईलीच लष्कराच्या विभागाकडे मंजुरीसाठी पाठविल्या जात आहेत, असे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या परिसरात लष्कराच्या विविध आस्थापना आहेत. काही ठरावीक आस्थापना वगळता इतर आस्थापनांच्या परिसरात १० मीटरपुढे खासगी बांधकाम करण्यास परवानगी आहे. शिवाय यासाठी कोणत्याही प्रकारचा ना हरकत दाखला (एनओसी) घ्यावा लागत नव्हता. मात्र, संरक्षण विभागाने १८ मे २०११, १८ मार्च २०१५, १७ नोव्हेंबर २०१५, २१ नोव्हेंबर २०१६ या तारखेचे सर्व आदेश रद्द केले. याऐवजी २३ डिसेंबर २०२२ चे नवे आदेश लागू राहतील, असे स्पष्ट केले. यामध्ये लष्कराच्या मिळकतीपासून ५० मीटरच्या आत बांधकाम करण्यासाठी स्थानिक लष्करी प्राधिकरणाची एनओसी बंधनकारक, केवळ मजल्यांपर्यंतच बांधकाम करता येणार, ५० मीटर ते ५०० मीटरपर्यंत चार मजल्यांपेक्षा अधिकचे बांधकाम करायचे असल्यास पुन्हा एकदा लष्कराची एनओसी, एखादे बांधकाम लष्करासाठी धोकादायक वाटल्यास त्याबाबत स्थानिक लष्करी प्राधिकरण बांधकामास मज्जाव करणार आदी अटींचा समावेश होता.

# यांत्रिकी पद्धतीने रस्ते सफाईची निविदा रद्द करा

## आ. अश्विनी जगताप: महापालिका आयुक्तांना निवेदन; 59 कोटी रुपयांचे संभाव्य नुकसान टाळण्याची मागणी

। पिंपरी। महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

पिंपरी-चिंचवड महापालिकेने शहरातील रस्त्यांची रोड स्वीपरमार्फत यांत्रिकी पद्धतीने साफसफाई करण्याच्या कामासाठी विशिष्ट ठेकेदार डोळ्यासमोर ठेवून निविदा प्रक्रिया राबवण्यात आली आहे. त्यामुळे या निविदेला कमी प्रतिसाद मिळाला असून, स्पर्धात्मक निविदा राबवण्याची गरज आहे. या निविदेमुळे सात वर्षात महापालिकेला तब्बल ५९ कोटी रुपयांचे नुकसान सहन करावे लागणार आहे. हा जनतेचा पैसा असल्यामुळे ही निविदा रद्द करावी आणि निविदेत जास्तीत जास्त ठेकेदारांनी सहभाग घ्यावा यासाठी स्पर्धात्मक निविदा प्रसिद्ध करण्यात यावी, अशी मागणी आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे केली आहे.

यासंदर्भात आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, “शहरातील रस्त्यांची यात्रिकी पद्धतीने साफसफाई करण्याच्या कामाची निविदा प्रसिद्ध केल्यानंतर १० ऑगस्ट २०२२ रोजी झालेल्या निविदापूर्व बैठकीत निविदेत नव्याने अट समाविष्ट करण्यात आली आहे. त्यानुसार स्वमालकीच्या दोन नग रोडस्वीपर असण्याच्या अनुभवाच्या अटीचा निविदेत नव्याने समावेश करण्यात आला.



### पारदर्शी व स्पर्धात्मक निविदा प्रसिद्ध करावेत

सुरूवातीला प्रसिद्ध केलेल्या निविदेत कोणतीही जाचक अट नव्हती. त्यावेळी तब्बल ३३ निविदा प्राप्त झाल्या होत्या. पण नंतर समाविष्ट केलेल्या जाचक अटीमुळे अनेक निविदाधारक बाद झाले आहेत. ते या निविदेत सहभागी होण्यापासून वंचित राहिले आहेत. परिणामी या निविदेत अधिकाऱ्यांच्या मर्जीतील केवळ चारच ठेकेदार पात्र झाल्याचे दिसत आहे. त्यामुळे या निविदेतून सात वर्षात महापालिकेचे तब्बल ५९ कोटी रुपये नुकसान होण्याची शक्यता आहे. अशा प्रकारे मनमानी कारभार करून शहरातील सामान्य नागरिकांच्या कष्टाच्या पैशांची केली जाणारी उधळपट्टी रोखणे आवश्यक आहे. त्यामुळे ही निविदा रद्द करून नव्याने पारदर्शी व स्पर्धात्मक निविदा प्रसिद्ध करण्याचे आपण आदेश द्यावेत, अशी मागणी त्यांनी केली आहे.”

# पुणे जिल्ह्यात भाजप खांदेपालट करणार!

## राहुल कुल, आशा बुचके यांची नावं आघाडीवर

। पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे जिल्ह्यात भाजपमध्ये मोठी खांदेपालट होण्याची शक्यता आहे. भाजपचे पुणे जिल्हाध्यक्ष गणेश भेगडे यांचा कार्यकाळ संपल्याने जिल्हाध्यक्ष बदलाच्या हालचाली सुरु झाल्या आहेत. तर पिंपरी चिंचवडचे शहराध्यक्ष महेश लांडगे यांचा देखील कार्यकाळ संपल्यानंतर पिंपरी चिंचवडचा शहराध्यक्ष देखील बदलण्याची हालचाल सुरु झाली आहे. तर कसब्यातील पराभवानंतर पुण्याचे शहराध्यक्ष जगदीश मुळीक यांची खुर्ची देखील डोक्यात आली आहे. गणेश भेगडे हे पक्षाचे सध्या जिल्हाध्यक्ष आहेत. त्यांचा तीन वर्षांचा कार्यकाळ संपला असून, नवे अध्यक्ष लवकरच निवडले जाणार आहे. नव्या नावांमध्ये प्रामुख्याने दौंडचे आमदार राहुल कुल, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य शरद बुट्टे पाटील, आशाताई बुचके आणि सध्याचे संघटन सरचिटणीस ॲड. धर्मेंद्र खांडरे यांच्या नावाची प्रामुख्याने चर्चा आहे.**

लक्ष्मण जगताप यांच्या निधनानंतर झालेल्या पोटनिवडणुकीत आपल्याला तिकीट मिळेल, अशी आशा शंकर जगताप यांना होती. मात्र सहानुभूतीची लाट पाहून पक्षनेतृत्वाने लक्ष्मण भाऊंच्या पत्नी अश्विनी जगताप यांना उमेदवारी दिली. दोन महिन्यांपूर्वी उमेदवारी हुकली पण आपल्या नेतृत्वगुणांनी शंकर जगताप यांनी वहिनींना निवडून आणलं. आता स्वत: देवेंद्र फडणवीस तीच कसर भरुन काढण्याच्या तयारीत आहेत.

पुणे भाजपचे जिल्हाध्यक्ष बाळा (गणेश) भेगडे यांच्याबरोबरच पिंपरी चिंचवडचे शहराध्यक्ष महेश लांडगे यांचा देखील कार्यकाळ संपला आहे. त्यामुळे प्रदेश भाजपाकडून आलेल्या संघटनात्मक सूचनांनुसार, पिंपरी-चिंचवड भाजपा शहराध्यक्ष व भोसरीचे आमदार महेश लांडगे यांनी आपल्या शहराध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे, असे खात्रीलायक वृत्त आहे. राज्यात भाजपाकडून संघटनात्मक पुर्नबांधणी करण्यात येत असून, ज्या शहराध्यक्ष, जिल्हाध्यक्ष, विभाग प्रमुखांचा कार्यकाळ संपला आहे, त्यांचे राजीनामे घेतले जातायेत. सध्या मुंबईत अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू आहे. त्यानंतर शहराध्यक्षपदासाठी घोषणा होईल, असं सांगितलं जातंय. २०१७ मधील महापालिका निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने पिंपरी-चिंचवडमध्ये दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा पराभव केला.



### भावाच्या जागेवरची उमेदवारी हुकली, पण आता फडणवीस कसर भरुन काढणार?

**दरम्यान, लक्ष्मण जगताप आजारी असल्याने त्यांचे बंधू शंकर जगताप यांची चिंचवड विधानसभा निवडणूक प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. ३ जानेवारी २०२३ रोजी जगताप यांचे निधन झाले. महिन्याभरात पोटनिवडणूक लागली. या निवडणुकीत अश्विनी जगताप यांना भाजपाची उमेदवारी मिळाली. शंकर जगताप यांनी नेतृत्व कौशल्य दाखवले आणि भाजपचा विजय सोपा केला. नुकत्याच झालेल्या चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीमध्ये 'जगताप पॅटर्न'मुळे निवडणूक जिंकली, असा दावा शिवसेना (ठाकरे गट) खासदार संजय राउत यांनी केला होता. त्यामुळे चिंचवडमध्ये भाजपची नव्हे, तर**



**जगताप कुटुंबियांची ताकद जिंकली, अशी चर्चा आहे. त्यामुळे शंकर जगताप यांना शहराध्यक्षपदी ताकद देवून भाजपा पक्षश्रेष्ठी आगामी महापालिका आणि विधानसभा निवडणुकीची तयारी करणार, असे सांगितले जात आहे.**

## महेश लांडगे यांचा कार्यकाळ पूर्ण

## पिंपरी-चिंचवडचा पुढचा अध्यक्ष कोण? जगताप यांना गुडन्यूज?

### अर्थसंकल्पीय अधिवेशनानंतर शहराला मिळणार नवा शहराध्यक्ष

**पुणे : राज्यात भाजपाकडून संघटनात्मक पुर्नबांधणी करण्यात येत असून, ज्या शहराध्यक्ष, जिल्हाध्यक्ष, विभाग प्रमुखांचा कार्यकाळ संपला आहे, त्यांचे राजीनामे घेण्यात येत आहेत. सध्या मुंबईत अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू आहे. त्यानंतर शहराध्यक्षपदासाठी घोषणा होईल, असा दावा केला जात आहे. त्यानुसारच आता भाजपचे पिंपरी-चिंचवडचे शहराध्यक्ष महेश लांडगे यांच्या कार्यकाळ पूर्ण झाल्याने पिंपरी-चिंचवड भाजपला अधिवेशनानंतर नवा शहराध्यक्ष मिळणार आहे.**

### राहुल कुल, आशा बुचके यांची नावं आघाडीवर

**पुणे जिल्हा हा राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला समजला जातो. पुण्यातील प्रत्येक तालुक्यात राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांची मोठी फळी काम करते. त्यामुळे येत्या विधानसभा निवडणुका पाहता भाजपला जिल्हाध्यक्ष म्हणून फक्त विधानसभा मतदारसंघापुरता मर्यादित नेता नको आहे. म्हणूनच राहुल कुल, आशा बुचके, शरद बुट्टे आणि धर्मेंद्र खांडरे यांसारख्या बड्या नेत्यांची नावं भाजपचे वरिष्ठ नेते तपासून पाहत आहेत. त्यात राहुल कुल हे उपमुख्यमंत्री देवेंद्र यांच्या अत्यंत जवळचे मानले जातात. शरद बुट्टे पाटील हे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य आहेत. जिल्हा परिषदेच्या कामाचा अनेक वर्षांचा त्यांचा अनुभव आहे. त्याचबरोबर राजगुरुनगर तालुक्यातला राजकारणात त्यांचा चांगला अभ्यास आहे. भाजपच्या पक्ष संघटनेतदेखील ते अनेक वर्षांपासून सक्रिय आहेत. आमदार कुल यांच्याप्रमाणेच बुट्टे पाटील देखील उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या जवळचे मानले जातात. दुसरीकडे, आशा बुचके या जिल्हा परिषदेत माजी सदस्य आहेत. शिवसेनेतून दीड वर्षांपूर्वी त्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. जुन्नर विधानसभा मतदारसंघातून आमदारकीसाठी अनेक वेळा प्रयत्न केल्यानंतरदेखील त्यांच्या पदरात अद्याप यश आलेलं नाही. जिल्हा परिषदेच्या सदस्य म्हणून त्या अनेक वर्ष काम करतायेत. लढाऊ कार्यकर्त्या अशी त्यांची ओळख आहे. जिल्हाध्यक्षांच्या स्पर्धेत विद्यमान संघटन सरचिटणीस ॲड. धर्मेंद्र खांडरे यांच्या नावाची देखील चर्चा आहे. ॲड. खांडरे हे मूळ संघ स्वयंसेवक आहेत. संघाच्या अधिवक्ता परिषद या वकीलांच्या संघटनेचे प्रदेशाध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले आहे.**

---

# पुणे शहरात सर्वत्र उदंड जाहले 'फ्लेक्स'

## पुणे महानगरपालिकेला पडला 'फ्लेक्स'विरोधातील कारवाईचा विसर

। पुणे। महाईन्यूज ।

**शहराच्या मध्यवर्ती भागासह विविध उपनगरांत सर्वत्र फ्लेक्स, होर्डिंग, बॅनरचा सुळसुळाट झाला आहे. यामध्ये सर्वाधिक 'फ्लेक्स' राजकीय असून, त्याकडे पालिका डोळेझाक करीत आहे. 'जी-२०' परिषदेवेळी फ्लेक्सबाबत आक्रमक होऊन तीन क्षेत्रीय सहायक आयुक्तांवर कारवाई करणाऱ्या महापालिकेला आता 'फ्लेक्स'विरोधातील कारवाईचा विसर पडल्याचे चित्र आहे.**

**चौकाचौकात फलक**

गुढीपाडवा व नववर्षाच्या शुभेच्छा देणारे 'फ्लेक्स' विविध राजकीय पक्षांच्या नेते कार्यकर्त्यांनी लावले आहेत. या निमित्त काही उपनगरांमध्ये आयोजित उपक्रमांची माहिती देणारे अनधिकृत फलक चौकाचौकात लागले आहेत. त्यावर उद्घाटक किंवा विशेष सहकार्य म्हणून माजी आमदार, माजी महापौर, माजी नगरसेवकांचे नाव अथवा फोटोही छापले आहेत.





सिग्नल व अन्य वाहतूक नियमन चिन्हेही अशा 'फ्लेक्स'मुळे झाकली गेली आहेत.

याशिवाय राजकीय नेते, भावी नगरसेवक, काही अध्यात्मिक गुरू व अन्य व्यक्तींचे वाढदिवस, कार्यक्रमांचे फ्लेक्सही सर्वत्र पाहायला मिळत आहेत

### शुभेच्छांचे फ्लेक्स

**शहराच्या मध्यवर्ती पेठांमध्ये नवनिर्वाचित आमदारांचे अभिनंदन आणि त्यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देणारे फ्लेक्सही अनेक ठिकाणी कायम आहेत. कोथरूडमध्ये एका नृत्यविषयक कार्यक्रमाचे फ्लेक्स, होर्डिंग्ज स्थानिक आमदार व पालकमंत्र्यांचा फोटो आणि स्थानिक कार्यकर्त्यांच्या नावाने प्रमुख चौकांसह गल्ली बोळांमध्येही लागले आहेत. काही व्यावसायिकांनी आपल्या खास ऑफरची जाहिरातही अनधिकृत फ्लेक्सवर माननीयांच्या नावासहित केल्या आहेत. गुढीपाडव्याला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा मेळावा ठाणे येथे होणार आहे.**

### कारवाईचे काय झाले?

'आपापल्या हद्दीत बेकायदा फ्लेक्स, होर्डिंग्ज, बॅनर, झेंडे लावू देऊ नका, लावल्यास हे फ्लेक्स, होर्डिंग्ज, बॅनर, झेंड्यासाठी ते लावणाऱ्या प्रत्येकाला प्रत्येकी एक हजार रुपये दंड करा,' असे आदेश महापालिका आयुक्त तथा प्रशासक विक्रमकुमार यांनी पूर्वीच क्षेत्रीय कार्यालयांना दिले आहेत. तरीही विशेषतः राजकीय दबावापोटी आणि लागेबांध्यांमुळे क्षेत्रीय कार्यालयांकडून या बेकायदा फ्लेक्स, 'बॅनर'वर कारवाई होत नसल्याच्या तक्रारी नागरिक करीत आहेत.

# वीज समस्यांसाठी उपमुख्यमंत्र्यांना साकडे!

## आमदार महेश लांडगे यांची मागणी : वीज पुरवठा विषयक तातडीची कामे मार्गी लागणार!

**।पिंपरी ।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**भोसरी विधानसभा मतदार संघाअंतर्गत औद्योगिक आणि घरगुती वीज ग्राहकांना भेडसावणाऱ्या समस्या सोडवण्याकरिता महावितरण प्रशासनाने पायाभूत सुविधा सक्षम कराव्यात. तसेच, प्रस्तावित प्रकल्प आणि विकासकामे मार्गी लावावीत, अशी मागणी भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.**

याबाबत राज्याचे उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र देण्यात आले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, भोसरी विधानसभा मतदार संघात औद्योगिक आणि निवासी अशा दोन्ही पट्ट्यातील वीज ग्राहकांना नियमितपणे वीज समस्यांना सामोरे जावे लागत आहे. समाविष्ट गावांत मोठ्या प्रमाणात लोकवस्ती वाढली असून, त्या तुलनेत वीज यंत्रणा सक्षम करण्यात आलेली नाही. त्यामुळे वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी काही विकासकामे तात्काळ मार्गी लावणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने राज्य सरकारकडे खालीलप्रमाणे कामे प्रस्तावित आहेत. त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध झाल्यास सदर कामे मार्गी लावता येतील.




यामध्ये प्राधान्याने सफारी पार्क मोशी अतिउच्चदाब (ई.एच.व्ही.) उपकेंद्र उभारण्यात यावे. त्याळे मोशी, डुडुळगांव, आकुर्डी, चिखली, तळवडे या भागातील औद्योगिक व निवासी पट्ट्यातील वीज पुरवठा सुरळीत होणार आहे. चऱ्होली अतिउच्चदाब (ई.एच.व्ही.) उपकेंद्र उभारण्यात यावे. ज्यामुळे भोसरी, चऱ्होली, दिघी, धानोरी या भागात पुरेशा दाबाने वीज पुरवठा करण्यासाठी मदत होणार आहे. भोसरी गावठाणे येथील नवीन स्विचिंग उपकेंद्र, ओव्हरहेड वीज वाहिन्याचे भूमिगत वाहिन्यांमध्ये रुपांतर करणे, तळवडे येथील देवी इंद्रायणी स्विचिंग उपकेंद्रातून स्वतंत्र फिडर बे व भूमिगत काम तातडीने करण्याची योजना राबवणे, नवीन उपविभाग व शाखा कार्यालय स्थापित करणे अत्यावशक आहे, असे आमदार लांडगे यांनी म्हटले आहे.

### भोसरी उपविभागाचे दोन उपविभाग होणार...

**भोसरी विभागांतर्गत भोसरी एमआयडीसी तसेच सभोवतालच्या परिसरात मोठ्या प्रमाणात नागरिकरण झाले आहे. औद्योगिक, घरगुती आणि व्यावसायिक ग्राहकांची संख्याही वाढलेली आहे. त्यामुळे ग्राहकांना अखंडित वीज पुरवठा देण्यासाठी कुशल प्रशासकी नियंत्रणासाठी भोसरी उपविभागाचे दोन उपविभाग करणे गरजचे आहे. भोसरी उपविभाग क्र. १ अंतर्गत भोसरीगांव शाखा, नाशिकरोड शाखा कार्यालय आणि चऱ्होली शाखा कार्यालय स्थापन करणे आवश्यक आहे. तसेच, भोसरी उपविभाग क्र. २ अंतर्गत इंद्रायणीनगर शाखा कार्यालय( नवीन प्रस्तावित), मोशी शाखा कार्यालय, आकुर्डी उपविभाग अंतर्गत चिखली शाखा कार्यालय ( नवीन प्रस्तावित) उभारण्याची आवश्यकता आहे. याबाबत ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. त्यामुळे आगामी काळात महावितरण पायाभूत सुविधांची निर्मिती करण्याला गती मिळेल, अशी अपेक्षा आमदार लांडगे यांनी व्यक्त केली आहे.**

---

# मोशीतील अग्निशमन केंद्र उद्घाटनाच्या प्रतीक्षेत!

## रुपाली आल्हाट यांचा इशारा : केंद्र सुरू करा अन्यथा आंदोलन करणार

**।पिंपरी।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने मोशी येथे अग्निशामक केंद्र उभारण्यात आले. पण, उद्घाटनाअभावी हे अग्निशामक केंद्र चालू होऊ शकले नाही. त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये नाराजीचा सूर आहे. सदर केंद्र तात्काळ सुरू करावे, अन्यथा आंदोलन करण्यात येईल, असा इशारा शिवसेनेच्या रुपाली आल्हाट यांनी दिला आहे.**



गेले सहा ते सात महिन्यापूर्वी श्री नागेश्वर महाराज अग्निशामक केंद्र मोशी या इमारतीचे काम पूर्ण झाले आहे. पण, उद्घाटन रखडले आहे. मोशी येथील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या नेत्या रूपाली परशुराम आल्हाट यांनी म्हटले आहे की, मोशीकरांना अग्निशामक केंद्र लाभले पण याचे उद्घाटन न झाल्याने ही इमारत पूर्ण होऊन पण मोशीकरांच्या कुठल्याही फायद्याचे नाही. या इमारतीचे उद्घाटन कोणाच्या हस्ते करायचे हे कळत नाही? मात्र, अशा परिस्थितीमध्ये मोशीमध्ये आगीचे प्रकार घडल्यास कोण जबाबदार असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

मोशी येथील कचरा डेपोत आगीच्या दुर्घटना घडतात. त्यावेळी कचऱ्याने पेट घेतल्यानंतर ही आग विझवण्याकरिता अग्निशामक दलाच्या गाड्या वायसीएम किंवा कुदळवाडी या केंद्रातून मागवाव्या लागतात. या गाड्या येण्यासाठी 30 ते 40 मिनिटे लागतात तोपर्यंत आगीने रुद्र रूप धारण केलेले असते.

आग आटोक्यात येण्याच्या पलीकडे गेली जाते. पण, हेच मोशी येथील अग्निशामक केंद्र चालू झाल्यानंतर गाडी पाच मिनिटाच्या आत त्या ठिकाणी पोहोचेल आणि आगीवरती नियंत्रण मिळू शकते.

> **मोशी येथील आजूबाजूच्या परिसरात कुठलाही प्रकार घडल्यानंतर आगे वरती नियंत्रण मिळवण्यासाठी मोशी अग्निशामक केंद्राचा चांगला उपयोग होणार आहे. पण, हे केंद्र मोशीकरांच्या सेवेत तात्काळ सुरू करण्यात यावे अन्यथा आंदोलन करण्यात येईल.**
>
> **- रुपाली आल्हाट, शिवसेना.**



---

# गुढीपाडव्यानिमित्त वडगावात उद्या मिरवणूक

**।वडगाव मावळ ।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

गुढीपाडवा व हिंदू नववर्षाचे स्वागत करण्यासाठी येथील मोरया प्रतिष्ठानच्या वतीने मिरवणुकीचे आयोजन केले असल्याची माहिती प्रतिष्ठानचे संस्थापक नगराध्यक्ष मयूर ढोरे यांनी दिली.

बुधवारी (ता. २२) सायंकाळी पाच वाजता येथील पंचायत समिती चौकातून या मिरवणुकीला सुरुवात होणार आहे. या शोभायात्रेत महाराष्ट्रातील विविध भागातील ३५० कलाकारांच्या उपस्थितीत विविध कला व संस्कृतीचे दर्शन आणि पारंपरिक मर्दानी खेळ पहावयास मिळणार आहे. त्यात प्रामुख्याने प्रभू श्रीरामचंद्राची अयोध्येतील मंदिर प्रतिकृती, महाराष्ट्राची लोकधारा, पोटोबा महाराज दिंडी पथक, टाळकरी ग्रुप, मल्लखांब प्रात्यक्षिके, शिवाजी महाराजांचे अष्टप्रधान मंडळ, ढोल पथक, आगीचे मर्दानी खेळ, रांगोळी पायघड्या, नंदीबैल, नगारा, गोंधळी, पोतराज, वासुदेव, कोळीगीत, लावण्यवती अशा विविध कलांचे सादरीकरण होणार आहे. राम, लक्ष्मण, सीता यांची भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. या शोभायात्रा मिरवणुकीमध्ये पारंपारिक वेशभूषा, ऐतिहासिक वेशभूषा, मावळे, सरदार, अष्टप्रधान, आध्यात्मिक वेशभूषा, संतजन इत्यादी वेशभूषेत वडगाव शहरातील नागरिकांनी सहभागी व्हावे, असे अबोली ढोरे यांनी सांगितले.



## संपादकीय

# बुडितांचे तिमिर जावो!

***अमेरिकी अर्थकारण आणि बँकिंग व्यवस्थेमधील दोष, कमतरता आणि छुप्या पद्धतीने चालणारी आर्थिक गुन्हेगारी यांच्याकडे अमेरिकी सरकार वारंवार डोळेझाक करीत आले आहे. अमेरिकेची रिझर्व्ह बँक मानली जाणारी 'द फेडरल रिझर्व्ह' म्हणजे 'फेड'ची भूमिकाही अनेकदा निष्पक्ष नसते. मुळात देशाची सेंट्रल बँक म्हणवली जाणारी फेड ही सरकारी नसून खासगी असावी, इथपासूनच अमेरिकी बँकिंग व्यवस्थेतील त्रुटी लक्षात येतात. तशी ती खासगी राहण्यातच अनेकांचे हितसंबंध गुंतलेले आहेत.***

'सिलिकॉन व्हॅली बँक' घनघोर संकटात सापडल्यानंतर जगभरातील आर्थिक बाजारांमध्ये जो गहजब उडाला आहे; तो स्वाभाविक असला तरी यावर अमेरिकी सरकार काही मुळातून उपाययोजना करील, अशी अपेक्षा ठेवण्यात अर्थ नाही. याचा एक दाखला म्हणजे, २००८ मध्ये अमेरिकी बँकिंगवर मोठे संकट कोसळले होते. तेव्हा अमेरिकी सरकार धावून गेले. त्यानंतर, देशातील बँकांवर अनेक निर्बंध लावण्यात आले. मध्यम आणि छोट्या आकाराच्या बँकांवरचे हे निर्बंध काढावेत, असे प्रयत्न लगेचच सुरू झाले. अदूरदृष्टीचे आणि तद्दन भांडवलखोर डोनाल्ड ट्रम्प यांनी अध्यक्ष झाल्यावर खरोखरच हे निर्बंध काढून टाकले. त्यातून सुटका झालेल्या बँकांमध्ये एसव्हीबी देखील होती. आणि निर्बंध जाण्यासाठी प्रयत्न करणाऱ्यांमध्ये या बँकेचे कर्तेधर्ते आघाडीवर होते. एसव्हीबीवर आज जे संकट कोसळले आहे; ते अर्थबाजारात किती पसरते आणि इतरही बँका संकटात सापडतात का, हे नवीन आठवडा सुरू झाल्यावर समजेल. न्यूयॉर्क तसेच इतर शेअर बाजारांवरही याचा काही परिणाम होतो का, हेही या आठवड्यात कळेल.

सिलिकॉन व्हॅली बँक संकटात सापडण्याचा भारताशी जवळचा संबंध आहे. याचे कारण, ही बँक प्रामुख्याने नवोद्योग म्हणजे स्टार्ट अप्सना अर्थसाह्य, कर्जे देते. हे नवोद्योग आपले इतर आर्थिक व्यवहारही या बँकेमार्फत करतात. साहस भांडवल निधी म्हणजे व्हेंचर कॅपिटल फंड्स नवोद्योगांच्या पाठिशी उभे राहतात. नवोद्योगांना साह्य देण्याचे विविध स्तर असतात. हे उद्योजक एकेक टप्पा यशस्वी करत पुढे गेले तर त्यांना अधिकाधिक साह्य मिळत जाते. आयटी क्षेत्रात अशा नवोद्योगांची संख्या खूप आहे आणि त्यात भारतीय तरुणांची संख्या लक्षणीय आहे.

# सारे काही इतरांसाठी कशाला?




कळत-नकळत आपण 'पीपल प्लीजिंग' करत असतो. याचा अर्थ स्वतःचे नुकसान करून किंवा स्वतःच्या गरजा बाजूला ठेवून इतर व्यक्तींना सुखावण्यासाठीचे वर्तन. इतर व्यक्तींच्या भावना सकारात्मक ठेवणे किंवा त्यांना आनंदी सुखी ठेवणे ही माझी जबाबदारी आहे, अशा प्रकारचा ठाम विश्वास असतो. वरवर पाहता हे काही नकारात्मक असेल असे वाटत नाही. मात्र, ही सवय निरोगी नाही.

सध्या पसरलेल्या फ्लूच्या साथीमध्ये माझी एक मैत्रीण, नम्रताही आजारी पडली. ऑफिसमधल्या सहकाऱ्याचा तिला फोन आला, 'अगं, परवाची ती प्रेझेंटेशनची फाइल तुझ्या लॅपटॉपवर आहे. तपासून मला सांग ना जरा. टीमनं केलेले बदल मी त्या दिवशी मीटिंगमध्ये नव्हतो ना; त्यामुळे माझ्याकडे नाहीत. आपल्या टीममधली तूच सगळ्यांत जास्त मदत करणारी आहेस म्हणून तुला विचारतोय. मला जरा पाठवशील का नवं प्रेझेंटेशन?' तिनं होकार देत बिछान्यातून उठली आणि बाहेरच्या खोलीत ठेवलेल्या लॅपटॉपकडे निघाली. हे बघून तिचा नवरा अशोक लगेच तिच्याकडे धावला आणि म्हणाला, 'काय करते आहेस तू? काय झालं? आत्ता काय गरज आहे तुला लॅपटॉपची?' त्यावर नम्रताने उत्तर दिले, 'अरे, ऑफिसमध्ये मला प्रेझेंटेशन दीपकला पाठवायचे आहे, नाही तर त्याची पंचाईत होईल.'

'अगं, तुझ्या टीममध्ये बाकीही लोक आहेत. ते पाठवतील. तू फोन करून विश्रांती घेत आहेस, असं सांग त्यांना.' 'अरे; पण त्यांनी मला मदत मागितली. मी त्याला नाही कसं म्हणू? कसं वाटेल ते? काय विचार करेल तो माझ्याबद्दल?' 'तू त्याची मदत कर त्याला मी नाही म्हणत नाही; पण तुझी स्वतःची तरी आधी मदत कर. स्वतःची काळजी घे आणि मग त्याच्यानंतर इतरांना मदत कर.'

'थांब रे. पंधरा मिनिटं लागतील मला जास्तीत जास्त. मग त्यानंतर विश्रांती घेते,' असं म्हणत हट्टाने नम्रताने ते त्यांचे काम करून ऑफिसमधल्या सहकाऱ्याला पाठवलेच. का बरे नम्रताने एवढ्या हट्टाने ती मदत केली? स्वतःला त्रास करून घेऊनही तिला इतरांना बरे वाटेल, इतरांची मदत करता येईल, इतरांच्या गरजा पूर्ण करता येतील या गोष्टीला प्राधान्य का द्यावेसे वाटले असेल? तुम्हीही करता का कधी असे?

ही सवय आपल्यापैकी अनेकांना असते. कळत-नकळत आपण 'पीपल प्लीजिंग' करत असतो. मात्र, याचा नेमका अर्थ काय ते पाहणे गरजेचे आहे. याचा अर्थ स्वतःचे नुकसान करून किंवा स्वतःच्या गरजा बाजूला ठेवून इतर व्यक्तींना सुखावण्यासाठीचे वर्तन. इतर व्यक्तींच्या भावना सकारात्मक ठेवणे किंवा त्यांना आनंदी सुखी ठेवणे ही माझी जबाबदारी आहे, अशा प्रकारचा एक ठाम विश्वास यामध्ये मनात पाहायला मिळतो. वरवर पाहता हे काही नकारात्मक असेल असे वाटत नाही. मात्र, ही सवय निरोगी नाही.

खरे तर, प्रत्येक माणसाच्या भावना या त्याची स्वतःची जबाबदारी असतात आणि त्यांच्या भावनांवर विचार करण्यावर इतर कुठल्याही व्यक्तीचा ताबा नसतो, हे आपण अगोदरच पाहिलेले आहे; त्यामुळे इतर व्यक्तींना सुखावण्यासाठी आपले वर्तन किंवा विचार बदलणे हे 'लॉजिकल' नाही. 'पीपल प्लीजिंग'मध्ये मात्र हे सगळे 'लॉजिक' गळून पडते आणि कुठल्या ना कुठल्या उद्दिष्टाने कळत-नकळत आपण इतर व्यक्तींना काय सुखावेल, त्यांना काय आवडेल, काय रूचेल हा विचार करून आपले वर्तन त्याप्रमाणे



बदलण्याचा प्रयत्न करत राहतो. त्रासदायक गोष्ट म्हणजे, अनेकदा हे करण्याच्या नादामध्ये आपण स्वतःच्या गरजाही बाजूला ठेवतो आणि स्वतःच्या कामांना, गरजांना डावलून दुसऱ्या व्यक्तीची मदत किंवा दुसऱ्या व्यक्तीला सुख देण्याचा प्रयत्न करतो. हे करताना मनात येणारे विचार हे प्रत्येक वेळी 'कॉन्शियसच' असतील असे नाही, तर आपण आपल्या नकळतही या दिशेला ढकलले जाऊ शकतो. आपण 'पीपल प्लीझर' आहोत की नाही हे कसे ओळखायचे? यामध्ये आपल्याला एक गोष्ट लक्षात घ्यावी लागेल, की इतर व्यक्तींना आवडतील अशा गोष्टी करणे ही मानवी नात्यांमध्ये सर्वत्र आढळणारी नैसर्गिक गोष्ट आहे आणि ती खूप छानही आहे. सकारात्मक आहे. मात्र, 'पीपल प्लीजर्स'मध्ये काही वैशिष्ट्ये पाहायला मिळतात. जसे, की या इतरांना सुखावणाऱ्या गोष्टी किंवा वर्तन केल्यानंतर मिळणाऱ्या आनंदामध्ये नियमितता नसणे. काही ठिकाणी त्यांना मदत करायला किंवा इतर व्यक्तींना आवडणाऱ्या गोष्टी करायला आवडते.

# छोटी कुटुंबं सुखी होतील!

**कुटुंब कल्याण आणि परिवार नियोजन या एका नाण्याच्या दोन बाजू आहेत. कमी मुले म्हणजे स्त्रीचे उत्तम आरोग्य आणि छोट्या परिवाराची नीट काळजी, देखभाल. प्रत्येक कुटुंब सुखी राहावे आणि राष्ट्राचा आर्थिक विकास झपाट्याने व्हावा, जीवनमान सुधारावे, राष्ट्रीय उत्पन्नाची दरडोई वाढ व्हावी यासाठी पुन्हा कुटुंब नियोजन कार्यक्रमाचा पाठपुरावा करायला हवा. जर कुटुंब नियोजन केले नाही, तर सर्वच सुविधा कमी पडतील.**

आपला भारत लोकसंख्येबाबत दुसऱ्या स्थानावर आणि चीन पहिल्या क्रमांकावर होता. गेल्या काही वर्षांत चीनची लोकसंख्या हळूहळू कमी झाली; परंतु आपली लोकसंख्या वाढतेच आहे. याचे कारण चीनने उचललेली पावले, आखलेली धोरणे. अर्थात ही धोरणे मानवतावादी नसतील; पण राष्ट्रहिताच्या दृष्टीने त्यांनी कठोर निर्णय घेतले. त्यामानाने आपण याबाबत फार काही केले नाही व आपली लोकसंख्या २०५० पर्यंत वाढतच राहणार आहे. २०५० नंतर लोकसंख्या कमी होईल (कदाचित 'हम दो हमारा/ हमारी एक' यामुळे) असे वर्तवले जाते.



अफाट लोकसंख्येमुळे आपण अनेक समस्यांना तोंड देत आहोत. १९६० साली देशात कुटुंब नियोजन कार्यक्रम जोमाने राबवला जात होता. १९६०-७० मध्ये गर्भपात कायद्याने मान्य केला व त्यामुळेसुद्धा लोकसंख्या नियंत्रण होण्यास मदत होते; पण आणीबाणीच्या काळात कुटुंब नियोजन सक्तीने केले गेले. अत्याचार झाले, त्यामुळे राजकीय पाठिंबा गेला आणि आरोग्यदृष्ट्यासुद्धा कुटुंब नियोजन कार्यक्रमाचा वेग मंद होत गेला. गेली ३०-४० वर्षे या विषयावर राजकीय पक्ष फारसे भाष्य करत नाहीत. त्यामुळे कुटुंब नियोजन हा राष्ट्रीय कार्यक्रम जरी असला, तरी तो फार जोमाने राबवला जात नाही.

भारतातील चित्रपट हे नेहमीच तत्कालीन समाजाचे प्रतिबिंब असतात. गेल्या १०० वर्षांच्या चित्रपटांचा अभ्यास करता गेल्या काही वर्षांत गावातील जनतेच्या आणि गरिबांच्या समस्या वाढल्या, त्यावर अनेक चित्रपट आले. टॉयलेट, सॅनिटरी पॅड्स यावर चित्रपट-राष्ट्रीय कार्यक्रम आले. जनजागृती झाली, लाखो शौचालये बांधली गेली. या समस्यांवर काम केले जाऊ लागले. हल्लीच्या काळातदेखील हळूहळू कुटुंब नियोजनाचा प्रसार करण्यासाठी नवीन चित्रपट येऊ लागले आहेत. वाढती लोकसंख्या आपल्या देशाला घातक आहे. त्यासाठी समाजामध्ये जाणीव निर्माण करणे व कुटुंब नियोजनाचा प्रसार करणे आवश्यक आहे. काही चित्रपटांत लहान मुलांना लैंगिक शिक्षण देण्याचा प्रयत्न कधी कधी टोकाचा वाटतो. सातवी-आठवीच्या वर्गातील मुलांना लैंगिक शिक्षणाचा किती फायदा, किती परिणाम होतो सांगणे कठीण आहे.

## ।। अभंगवाणी ।।



तीळ जाळिले तांदुळ ।
काम क्रोधे तैसे चि खळ ॥१॥
कां रे सिणलासी वाउगा ।
न भजतां पांडुरंगा ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# राज्यात टाईमपास सरकार!

## » पंचनामे नाहीत आणि शेतकऱ्याला नुकसान भरपाईही नाही : नाना पटोले

| खेड | महाईन्यूज |

**अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे होत नाहीत आणि मदतही जाहीर केली जात नाही. राज्यातील शिंदे फडणवीस सरकार हे टाईमपास सरकार आहे, असा हल्लाबोल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला.**

अवकाळी पावसाने राज्यातील शेतकरी हवालदिल झाला आहे. हातातोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला आहे. सरकारने तातडीने शेतकऱ्यांना नुकसानभरपाई दिली पाहिजे, अशी विरोधी पक्षांची मागणी आहे. परंतु शेतकरी संकटात असतानाही राज्य सरकार मदतीसाठी काहीच हालचाल करताना दिसत नाही. केवळ पोकळ घोषणा देऊन वेळ मारून नेत आहेत.

अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे होत नाहीत आणि मदतही जाहीर केली जात नाही. राज्यातील शिंदे फडणवीस सरकार हे टाईमपास सरकार आहे, असा हल्लाबोल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला.

विधिमंडळ परिसरात प्रसार माध्यमांशी बोलताना नाना पटोले म्हणाले की, राज्यात सत्तेवर असलेल्या सरकारला शेतकऱ्यांच्या हिताशी काही देणंघेणं नाही. आधीच शेतमालाला भाव नसल्याने शेतकरी अडचणीत सापडलेला आहे, त्यात अवकाळी पावसाने झोडपल्याने शेतातील उभे पीक वाया गेले आहे. सरकारने तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई दिली पाहिजे, पण पंचनामे करण्यास कर्मचारीच नाहीत. सरकारी कर्मचारी संपावर आहेत आणि सरकार टाईमपास करत आहे. पंचनामे करण्यास उशीर होत असेल तर सरकारने तातडीने रोख मदत शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करावी, असंही नाना पटोले म्हणालेत.

महाविकास आघाडी सरकार असताना नैसर्गिक संकट आले असता तातडीने १० हजार रुपयांची रोख मदत देण्यात आली होती, नंतर पंचनामे करून मोठे पॅकेजही दिले. पण शिंदे-फडणवीस सरकारला शेतकऱ्यांच्या दुःखाची जाणीव नाही. शेतकरी आत्महत्या दररोज होत आहेत असे विद्धावलेले विधान या सरकारचे मंत्री करत आहेत. शेतकऱ्याच्या मदतीला धावून जाण्यासाठी सरकारची इच्छाशक्ती असावी लागते ती या सरकारकडे नाही. दोन दिवसावर गुढी पाडव्याचा सण आहे, हा सण कसा साजरा करायचा? असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा राहिला आहे, असेही नाना पटोले यांनी सांगितले.

### सरकार टाईमपास करत आहे

**» विधिमंडळ परिसरात प्रसार माध्यमांशी बोलताना नाना पटोले म्हणाले की, राज्यात सत्तेवर असलेल्या सरकारला शेतकऱ्यांच्या हिताशी काही देणंघेणं नाही. आधीच शेतमालाला भाव नसल्याने शेतकरी अडचणीत सापडलेला आहे, त्यात अवकाळी पावसाने झोडपल्याने शेतातील उभे पीक वाया गेले आहे. सरकारने तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई दिली पाहिजे, पण पंचनामे करण्यास कर्मचारीच नाहीत. सरकारी कर्मचारी संपावर आहेत आणि सरकार टाईमपास करत आहे.**




# पाडवा तोंडावर आनंदाचा शिधा मात्र शासकीय गोदामांमध्येच पडून!

## » सरकारी कर्मचाऱ्यांच्या संपामुळे वाटपात अडथळा

| मुंबई | महाईन्यूज |

गुढीपाडवा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त राज्य सरकारने राज्यातील एक कोटी 58 लाख शिधाधारक कुटुंबांना शंभर रुपयांत आनंदाचा शिधा (ANANDACHA SHIDHA) देण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र कर्मचारी संपामुळे हा शिधा अद्याप शासकीय गोदामांमध्येच पडून आहे. त्यामुळे गुढी पाडव्याला आनंदाचा शिधा सर्वसामान्यांपर्यंत पोहचण्याची शक्यता मावळत चालली आहे..

गुढी पाडवा गोड धोड करून साजरा करता यावा यासाठी शिधापत्रिकाधारक कुटुंबं आनंदाचा शिध्यासाठी रेशनिंग दुकानांमध्ये हेलपाटे मारत आहेत . पाडव्याला फक्त एक दिवस उरलेला असताना देखील शिधा दुकानांमध्ये न पोहचल्यानं सर्वांना हात हलवत परत जावं लागतंय. राज्यातील 1 कोटी 58 लाख शिधापत्रिका धारकांना राज्य सरकारने २२ मार्चला साजरा होणारा गुढी पाडवा आणि 14 एप्रिलला साजरी होणारी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती यासाठी हा आनंदाचा शिधा देण्याचा निर्णय घेतला . शंभर रुपयांमध्ये या शिधापत्रिका धारकांना प्रत्येकी एक किलो साखर, रवा, डाळ आणि तेल दिलं जाईल असं सरकारने जाहीर केलं. पण सरकारी कर्मचाऱ्यांनी अचानक संप सुरु केल्यानं हा शिधा गोदामांमध्येच अडकून पडलाय .



हा आनंदाचा शिधा वेळेत न पोहचण्यात सरकारी कर्मचाऱ्यांच्या संपाबरोबरच प्रशासनाचा हलगर्जीपणाही कारणीभूत आहे. कारण आनंदाचा शिधा वाटपाचा निर्णय सरकारने 22 फेब्रुवारीला जाहीर केला होता. पण त्याचा शासकीय आदेश काढण्यासाठी 16 मार्च उजाडले. तोपर्यंत शासकीय कर्मचाऱ्यांचा संप सुरु झाला होता. ज्यामुळं वेळेत शिधा पोहचणं आणखी अवघड बनलं . मागील वर्षी दिवाळीच्या सणासाठी देखील शंभर रुपयांमध्ये असाच आनंदाचा शिधा देण्याचा निर्णय राज्य सरकराने घेतला होता. मात्र त्यावेळी देखील प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे अनेक ठिकाणी दिवाळी उलटून गेली तरी शिधा पोहचला नव्हता.

# सरकारी कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप अखेर मागे

## » राजपत्रित अधिकारी संघटनेबरोबर मुख्यमंत्र्यांची बैठक

| मुंबई | महाईन्यूज |

**राज्यभरातील वेगवेगळ्या विभागातील शासकीय कर्मचाऱ्यांनी जुन्या पेन्शनसाठी पुकारलेला बेमुदत संप अखेर मागे घेण्यात आलाय. आज या संपाचा सातवा दिवस होता. या मागणीसाठी संपकरी कर्मचाऱ्यांनी कामबंदची हाक दिली होती. राजपत्रित अधिकारी संघटनेबरोबर आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बैठक घेतली. या बैठकीनंतर राज्य सरकारी निमसरकारी समन्वय समितीचे निमंत्रक विश्वास काटकर यांनी बेमुदत संप मागे घेण्यात आला असल्याची माहिती माध्यमांना दिली.**



जोपर्यंत सरकार जुन्या पेन्शन योजनेविषयी काही निर्णय घेत नाही तोपर्यंत संप सुरू राहणार आहे. अशी भूमिका राज्यातील सरकारी कर्मचाऱ्यांनी घेतली होती. राजपत्रित अधिकारी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांसोबत आज मुख्यमंत्र्यांनी बैठक घेतली.

जोपर्यंत सरकार जुन्या पेन्शन योजनेविषयी काही निर्णय घेत नाही तोपर्यंत संप सुरू राहणार आहे. अशी भूमिका राज्यातील सरकारी कर्मचाऱ्यांनी घेतली होती. रुग्णालयांमध्ये तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचारी नसल्याने स्वच्छतेचे तीन तेरा वाजले असून शस्त्रक्रिया रखडल्या होत्या. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संपाचा फटका शाळा, कॉलेजांतील नियमित वर्गांना बसू लागला होता. कृषी विभागाचेही कर्मचारी सहभागी झाल्याने गेल्या दोन दिवसांपासून होत असलेल्या अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानीचे पंचनामे कोण करणार, असा प्रश्न कृषी अधिकाऱ्यांसमोर उभा होता. परंतू राज्यातील सरकारी कर्मचाऱ्यांनी हा बंद मागे घेतल्यानं राज्याचा गाडा पुन्हा रूळावर येणार आहे.


# चीनचे राष्ट्रपती रशिया-युक्रेन युद्ध संपवणार?

## पुढच्या आठवड्यात जिनपिंग रशिया दौऱ्यावर

। नवी दिल्ली । महाईन्यूज ।

**चीनचे राष्ट्रपती शी जिनपिंग पुढच्या आठवड्यात रशिया दौऱ्यावर जाणार आहेत. यावेळी ते रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांची भेट घेतील. एकीकडी रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्ध सुरु असताना ही भेट होणार आहे. जिनपिंग तीन दिवसीय रशिया दौऱ्यावर जाणार आहेत.**

रशियन फेडरेशन क्रेमलिनने शुक्रवारी याबाबत माहिती देताना सांगितलं आहे की, चीनचे राष्ट्रपती शी जिनपिंग 20 ते 22 मार्च यादरम्यान तीन दिवस रशियाच्या दौऱ्यावर जाणार आहेत. यावेळी ते रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांची भेट घेणार आहेत. पुतिन यांनी शी जिनपिंग यांना रशियाला



दौऱ्यावर आमंत्रण दिल्याची बातमी रशियाच्या टास वृत्तसंस्थेने 30 जानेवारी रोजी दिली होती.

### जिनपिंग पुतिन आणि झेलेन्स्की यांच्याशी चर्चा करणार

चीनचे राष्ट्रपती शी जिनपिंग पुढील आठवड्यात रशिया दौऱ्यावेळी राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांची भेट घेऊन युद्धासंबंधित चर्चा करतील. तसेच जिनपिंग युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की यांच्याशी व्हर्च्युअल बैठक करण्याचीही शक्यता आहे. तज्ज्ञांच्या मते, रशिया आणि युक्रेन यांच्यातील संघर्ष दूर करण्यासाठी चीनचा सक्षम असेल अशी फारशी आशा नाही. चीनला यामध्ये किती यश मिळेल, हे आता पाहावं लागणार आहे.

### पुढच्या आठवड्यात जिनपिंग रशिया दौऱ्यावर

**» चीनचे राष्ट्रपती शी जिनपिंग 20 ते 22 मार्च रोजी रशिया दौऱ्यावर आहेत. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयो यासंदर्भात माहिती दिली आहे. जिनपिंग आता रशिया आणि युक्रेनमधील युद्ध शांतता मार्गाने सोडवण्यासाठी प्रयत्नशील आहेत. यासाठी ते पुतीन यांच्यासोबत चर्चा करणार असून युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर झेलेन्सी यांच्यासोबतही चर्चा करणार आहेत.**

### चीनचे राष्ट्रपती रशिया-युक्रेन युद्ध संपवणार?

**»रशिया-युक्रेन युद्धात चीनची भूमिका आतापर्यंत वादापासून दूर राहण्याची होती. याशिवाय चीनने रशियावर कोणत्याही प्रकारे टीका करणं टाळलं, पण आता चीनने दोन्ही देशांनी शांततेने चर्चा करून वाद सोडवण्याचा प्रयत्न करण्याची, इच्छा व्यक्त केली आहे. या संदर्भात चर्चा करण्यासाठी आता चीनचे राष्ट्रपती शी जिनपिंग रशिया दौऱ्यावर जाणार आहेत.**

# अदानी समूहाकडून ३४,९०० कोटींचा प्रकल्प स्थगित!

। नवी दिल्ली । महाईन्यूज ।



अदानी समूहाने गुजरातमधील मुंद्रा येथील ३४,९०० कोटींच्या पेट्रोकेमिकल प्रकल्पाचे काम थांबवले. हिंडेनबर्गच्या अहवालानंतर अदानी समूहाच्या समभागांचे बाजारमूल्य मोठ्या प्रमाणात घसरल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. गुंतवणूकदारांच्या चिंता दूर करण्यासाठी आणि समूहात स्थैर्य आणण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती आहे.

गुजरातमधील कच्छ जिल्ह्यात मुंद्रा येथील अदानी पोर्ट्स अँड स्पेशल इकॉनॉमिक झोन येथे ग्रीनफिल्ड कोळशापासून पीव्हीसी तयार करण्याचा प्रकल्प उभारण्यासाठी अदानी एंटरप्राइझेस लिमिटेडने मुंद्रा पेट्रोकेमिकल लिमिटेड ही उपकंपनी स्थापन केली होती. हिंडेनबर्ग अहवालामुळे बसलेल्या धक्क्यानंतर कंपनीने काही कर्जाची परतफेड, कंपनीच्या कामात स्थैर्य आणि आरोपांना उत्तर देणे या उपाययोजनेने गुंतवणूकदारांच्या चिंता दूर करण्याचे धोरण अवलंबले आहे.त्याचाच एक भाग म्हणून रोख पैशांची आवक आणि उपलब्ध वित्तसहाय्य यांच्या आधारे सर्व प्रकल्पांचे पुनर्मुल्यांकन केले जात आहे.

### उत्तम आर्थिक स्थितीचा दावा

**»कंपनीने संबंधित विक्रेते आणि पुरवठादार यांना ईमेलद्वारे पुढील सूचना मिळेपर्यंत सर्व कामकाज तातडीने थांबवण्यास सांगितले आहे. आमच्या प्रत्येक स्वतंत्र पोर्टफोलियो कंपनीचा ताळेबंद मजबूत आहे, असा दावा समूहाच्या प्रवक्त्यांनी केला आहे. समूहाकडे आघाडीची प्रकल्प विकास आणि अंमलबजावणीसाठी आवश्यक क्षमता, उत्तम प्रशासन, सुरक्षित मालमत्ता, रोख रकमेची आवक आहे आणि आमच्या व्यवसाय योजनांसाठी पूर्ण निधी उपलब्ध आहे, असे प्रवक्त्यांनी सांगितले. आमच्या भागधारकांसाठी संपत्ती निर्मितीची आधी आखून घेतलेल्या धोरणांची अंमलबजावणी करण्यावर आमचे लक्ष एकवटलेले आहे असे ते म्हणाले.**

## शॉर्ट न्यूज

### इम्रान खान यांच्या पक्षावर बंदी?

**इस्लामाबाद :** पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्या लाहोरमधील निवासस्थानातून शस्त्रे व पेट्रोल बॉम्ब जप्त करण्यात आल्याचा दावा पोलिसांनी केल्यानंतर, इम्रान अध्यक्ष असलेल्या पाकिस्तान तेहरीक-ए-इन्सान पक्षाला 'प्रतिबंधित' संघटना जाहीर करण्याची प्रक्रिया सुरू करण्याबाबत तज्ज्ञांशी सल्लामसलत करण्याचा सरकारचा विचार असल्याचे पाकिस्तानचे अंतर्गत मंत्री राणा सनाउल्ला यांनी म्हटले आहे.

खान हे इस्लामाबादमध्ये असताना, पंजाब पोलिसांच्या दहा हजारांहून अधिक सशस्त्र कर्मचाऱ्यांनी लाहोरच्या झमन पार्कमधील त्यांच्या निवासस्थानी मोठी मोहीम हाती घेतली, त्यांच्या अनेक समर्थकांना अटक केली आणि शस्त्रे व पेट्रोल बॉम्ब जप्त केल्याचा दावा केला.

# हिंदू – ख्रिश्चन धार्मिक विधींना गावात बंदी

## छत्तीसगढ राज्यातील धर्मांतर रोखण्यासाठी बस्तरमधील ग्रामसभेचा अजब ठराव

। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**छत्तीसगढ राज्यातील आदिवासीबहुल बस्तर जिल्ह्यातील एका ग्रामसभेने अजब ठराव केला आहे. या ठरावानुसार बाहेरील धर्मांच्या धार्मिक उत्सवांना गावात बंदी करण्यात आली आहे, तसेच कोणतेही धार्मिक विधी पार पाडायचे असतील तर ग्रामसभेची आगाऊ परवानगी घ्यावी लागेल. रानसरगीपाल या गावातील ग्रामसभेने हा ठराव केला असून स्थानिक आदिवासींनी हिंदू आणि ख्रिश्चन नागरिकांच्या शेतावर कामाला जाऊ नये, असेही या ठरावाच्या माध्यमातून सांगितले आहे.**

१५ मार्च रोजी हा ठराव संमत करण्यात आला. या



ठरावाचे कारण देताना सांगण्यात आले की, हिंदू आणि ख्रिश्चन धर्मप्रसारकांमुळे अनेक आदिवासी लोक धर्मपरिवर्तन करत आहेत. ज्यामुळे आदिवासी संस्कृती, परंपरा आणि पेहराव कायमचे नष्ट होत आहेत. या ठरावाच्या माध्यमातून फक्त धार्मिक कार्यक्रमच नाही, तर सरकारचे विकास प्रकल्प किंवा व्यावसायिक उपक्रम राबविण्याच्या आधी ग्रामसभेची परवानगी घ्यावी लागणार आहे. तसेच एखाद्या धर्मप्रसारकाने त्याच्या धर्माचा गावात प्रसार केल्यास त्यावर कारवाई करण्याचा इशाराही या ठरावाच्या माध्यमातून दिला आहे.


गावातील सर्व धार्मिक विधी जसे की, बाळाचे नामकरण, लग्न, प्रार्थना अशा सर्व विधींची पूर्तता गावातील पारंपरिक यंत्रणा 'गायता'मार्फत केली जाईल.या ठरावातून आणखी एक चमत्कारिक बाब समोर आली. ती म्हणजे ख्रिश्चन समुदायातील कुणालाही त्यांच्या सदस्यांचे मृतदेह गावात पुरता येणार नाहीत. जर कुणी तसा प्रयत्न केला तर त्यांना गावाबाहेर काढण्यात येईल. बस्तर जिल्ह्यातील सरकारी अधिकाऱ्यांनी सांगितले, "अशा प्रकारच्या ग्रामसभेच्या ठरावाला कोणताही कायदेशीर आधार नाही. जर धर्मांच्या आधारावर गावातील नागरिकांनी काही भेदभाव केला तर त्यांच्यावर कायद्याप्रमाणे कारवाई करू. धर्मांतर थांबविण्यासाठी अशा प्रकारचा ठराव केला गेला असावा."

बस्तरचे आदिवासी नेते आणि माजी केंद्रीय मंत्री अरविंद नेतम (८०) म्हणाले, "आदिवासींची सरकारकडून घोर निराशा झाल्यामुळेच अशा प्रकारचे वाद उद्भवत आहेत.पेसा कायदा अमलात आणण्यासाठी आम्ही अपार कष्ट घेतले, आजच्या घडीला आदिवासींसाठी सर्वात महत्त्वाचा असा हा कायदा आहे. पण या कायद्याची प्रामाणिकपणे अंमलबजावणी होत नाही.

### 'गायता'मार्फत सर्व विधींची पूर्तता

**» १५ मार्च रोजी हा ठराव संमत करण्यात आला. या ठरावाचे कारण देताना सांगण्यात आले की, हिंदू आणि ख्रिश्चन धर्मप्रसारकांमुळे अनेक आदिवासी लोक धर्मपरिवर्तन करत आहेत. ज्यामुळे आदिवासी संस्कृती, परंपरा आणि पेहराव कायमचे नष्ट होत आहेत. या ठरावाच्या माध्यमातून फक्त धार्मिक कार्यक्रमच नाही, तर सरकारचे विकास प्रकल्प किंवा व्यावसायिक उपक्रम राबविण्याच्या आधी ग्रामसभेची परवानगी घ्यावी लागणार आहे. तसेच एखाद्या धर्मप्रसारकाने त्याच्या धर्माचा गावात प्रसार केल्यास त्यावर कारवाई करण्याचा इशाराही या ठरावाच्या माध्यमातून दिला आहे. गावातील सर्व धार्मिक विधी जसे की, बाळाचे नामकरण, लग्न, प्रार्थना अशा सर्व विधींची पूर्तता गावातील पारंपरिक यंत्रणा 'गायता'मार्फत केली जाईल.**

## लवकरच रॅम्पवर परत येण्याची इच्छा...



महानायक अमिताभ बच्चन यांनी दशकांपासून बॉलिवूड चित्रपटसृष्टीचा काळ गाजवला. आजही ते चित्रपटसृष्टीत तितकेच सक्रिय आहेत. 80 वर्षीय अमिताभ अभिनयापासून ते निवेदनापर्यंत अनेक क्षेत्रात कार्यरत आहेत. दरम्यान, नुकत्याच काही दिवसांपूर्वी एका शूटिंगदरम्यान, अमिताभ यांचा अपघात झाला होता. मात्र, आता यातून ते पूर्ण बरे झाले असून याबाबत त्यांनी सोशल मीडियावर अपडेट दिली आहे.अमिताभ सोशल मीडियावर खूप सक्रिय असतात. ते त्यांच्या प्रोफेशनल आणि पर्सनल आयुष्याबाबत देखील नवनवीन अपडेट चाहत्यांना शेअर करत असतात. नुकतीच त्यांनी सोशल मीडियावरुन त्यांची हेल्थ अपडेट चाहत्यांना दिली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी त्यांचा जुना एक रँप वॉकदरम्यानचा एक फोटो शेअर केला आहे. ज्यात त्यांनी काळ्या रंगाचा कुर्ता-पायजमा परिधान केला आहे. या फोटोसोबत खाली कॅप्शनमध्ये त्यांनी लिहिलंय की, "तुमच्या प्रार्थनेसाठी आणि मला बरं होण्यासाठी शुभेच्छा दिल्याबद्दल धन्यवाद. लवकरच रॅम्पवर परत येण्याची इच्छा आहे." असं अमिताभ यांनी लिहिलं आहे.

## ज्योती अरोराने पटकावला मानाचा किताब

अकरा वर्षांपासून एक आगळीवेगळी सौंदर्य स्पर्धा म्हणून 'मिसेस इंडिया पेजंट' सौंदर्य स्पर्धेला ओळखले जाते. या वर्षी सुद्धा या स्पर्धेची सर्वांना उत्सुकता होती.
'मिसेस इंडिया पेजेंट' हे भारतातील विवाहित महिलांसाठीचे हक्काचे व्यासपीठ आहे. या वर्षी हा कार्यक्रम इरॉस हॉटेल, दिल्ली येथे आयोजित करण्यात आला होता. या ब्युटी कॉम्पिटिशन मध्ये ज्योती अरोरा 'मिसेस इंडिया'ची विजेती ठरली. ज्योतिषी आणि फेंगशुई मास्टर ज्योती अरोरा यांनी 'मिसेस' ही पदवी जिंकली. ज्योतिषी आणि फेंगशुई मास्टर ज्योती अरोरा यांनी 'मिसेस इंडिया' ही स्पर्धा जिंकली. क्लासिक सौंदर्य स्पर्धेत ज्योती अरोराने मिसेस इंडीया हा किताब पटकावला. 18 मार्च 2023 रोजी इंडिया ब्युटी पेजंट स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.
ज्योतीने हि स्पर्धा जिंकल्याने तिच्या डोक्यावर विजेत्याचा मुकुट सजवण्यात आला. या कार्यक्रमादरम्यान भारताच्या संचालिका दीपाली फडणीस याशिवाय आजी माजी विजेत्यांनी भाग घेतला होता.




## धमकी मिळाल्यानंतर कुठे आहे सलमान खान?



बॉलीवूडचा सुपरस्टार सलमान खानला पुन्हा एकदा जीवे मारण्याच्या धमकीचा मेल आला आहे. ज्यानंतर बान्द्रा येथील सलमान राहत असलेल्या गॅलेक्सी अपार्टमेंट भोवती कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे.या प्रकरणात पोलिसांनी लॉरेन्स बिश्नोई, गोल्डी बराड आणि रोहित गर्ग यांच्या विरोधात एफआयआर दाखल केली आहे. सोबत पोलिसांनी सलमान खानला कोणत्याही आऊटडोअर शूटसाठी किंवा इतर बाहेरील कुठल्याही इव्हेंटसाठी घराबाहेर पडण्यास मनाई केली आहे.

अर्थात आता तसं पाहिलं तर सलमान खान मुंबईतच नाही आहे. तो आपला आगामी सिनेमा 'किसी का भाई किसी की जान' सिनेमाच्या प्रमोशनमध्ये व्यस्त आहे. (SALMAN KHAN सलमान खान सध्या मुंबईत नाही आणि कधी परत येणार याविषयी कोणतीही माहिती समोर आलेली नाही. सुरक्षेच्या कारणांना लक्षात घेऊन सलमान सध्या कुठे आहे याबाबतीत गुप्तता पाळण्यात आली आहे. सलमान सध्या आपला आगामी सिनेमा 'किसी का भाई,किसी की जान' या सिनेमाच्या प्रमोशन मध्ये व्यस्त असल्याचं सांगितलं जात आहे. सलमानच्या जीवाला असलेला धोका लक्षात घेऊन मुंबई पोलिसांनी त्याला कुठल्याही सार्वजनिक ठिकाणी जाण्यापासून,आऊटडोअर शूटला जाण्यापासून किंवा कोणत्याही प्रमोशनल इव्हेंटला उपस्थित राहण्यास सक्त मनाई केली आहे.याव्यतिरिक्त बंदुकधारी सुरक्षा रक्षकांशिवाय सलमाननं घराबाहेर पडू नये असं देखील सांगितलं आहे.सलमानसोबतच सलमानच्या कुटुंबाचीही सुरक्षा वाढवण्यात आली आहे. सलमान खानचे वडील सलीम खान आणि त्याचं पूर्ण कुटूंब सगळेच एकत्र गॅलेक्सी अपार्टमेंटमध्ये राहतात. त्यामुळे पोलिसांनी सुरक्षेच्या कारणास्तव सलमान खानच्या संपूर्ण कुटुंबावरच घराबाहेर न पडण्याची सक्ती आणली आहे. सलमान खानच्या टीममधील प्रशांत गुंजाळकर याला हा धमकीचा ईमेल आला आहे. हा ईमेल रोहित गर्ग नावाच्या व्यक्तीनं पाठवला आहे. या प्रकरणात रोहित गर्ग,लॉरेन्स बिश्नोई आणि गोल्डी बराड यांच्या विरोधात केस दाखल केली गेली आहे लॉरेन्स बिश्नोईनं याआधी देखील सलमान खानला एका व्हिडीओ मुलाखतीच्या माध्यमातून धमकी दिली आहे.

## लाडक्या लेकीबद्दल ट्विंकल खन्नाला वाटतेय खंत



बॉलिवूडचा खिलाडी कुमार अर्थात अक्षय कुमार आणि त्याची पत्नी ट्विंकल खन्ना बॉलिवूडमधील एक आदर्श जोडपं. दोघे सोशल मीडियावर सक्रीय असतात. अक्षय कुमार बॉलिवूड चित्रपटांमध्ये व्यस्त असतो तर ट्विंकलचा स्वतःचा इंटेरियर डिझायनिंगचा व्यवसाय आहे. तसेच ती विविध कार्यक्रमात सहभागी होत असते. आपली मतं ठामपणे मांडत असते. नुकतेच तिने आपल्या मुलीविषयी भाष्य केलं आहे.

२०२० साली आलेल्या करोना महामारीच्या आजरामुळे संपूर्ण जगाचे चित्र बदलेले. संपूर्ण मानवी जीवन विस्कळीत झाले होते. ट्विंकल खन्ना नुकतीच शेफ संजय कपूर यांच्या कार्यक्रमात उपस्थित होती. तेव्हा तिने करोना काळात मुलीला कोणते जेवण दिले याबद्दलचे स्पष्टीकरण दिले आहे. ती असं म्हणाली, "महामारीच्या काळात मी तिला पीनट बटर सँडविच खायला दिले कारण मला स्वयंपाक करता येत नव्हता. मला स्वयंपाक कसा करायचा हे माहित नाही. माझ्या पटीने सांगितले होते मी जेवण बनवणार नाही."ती पुढे म्हणाली "माझी मुलगी पुढे थेरपी घ्यायला गेली तर ती सांगेल की इतर पालक त्यांच्या मुलांना पास्ता, बनाना ब्रेड असे पदार्थ बनवून देते होते मात्र माझ्या आईने मला फक्त पीनट बटर सँडविच खायला दिले आहे."

## 'खान' आडनावं काढणं मलायकाच्या आयूष्यातील सर्वात मोठी चुक?

बॉलिवूड अभिनेत्री मलायका अरोरा ही तिच्या व्यावसायिक आयुष्यापेक्षा तिच्या वयक्तिक आयूष्यामुळे जास्त चर्चेत असते. ती सतत काही ना काही कारणाने सर्वाचे लक्ष तिच्याकडे वेधुन घेते. लवकरच वयाची पन्नाशी गाठणारी मलायका ही अजूनही खुप तरुण दिसते. त्यासाठी ती तितकी मेहनतही घेते. 'त्या' अभिनेत्यासोबत काम करणं माझं स्वप्नच.., साऊथ इंडस्ट्रीत हवा करण्यासाठी तयार

तिला बॉलिवुडवची फिटनेस फ्रिक यामुळेच म्हटलं जाते. कधी अर्जुन कपूरला डेट केल्यामुळे तर कधी तिच्या कपड्यामुळे तर कधी तिच्या चालण्यामुळे ती नेहमीच ट्रोलही होत असते. मात्र तिच्यावर या ट्रोलिंगचा काहीही परिणाम होत नाही असंही ती स्पष्टच म्हणते. नुकतच तिने तिच्यावर होत असलेल्या ट्रोलिंगसाठी 'मूव्हिंग इन विथ मलायका' हा शो देखील सुरु केला होता. चुलत बहिण काजोल! हिट चित्रपटातून बाहेर काढण्याचा केला होता प्रयत्न

मलायका अरबाज खानपासून घटस्फोट घेतल्यानंतर जरा जास्तच चर्चेत आली. तिने आयुष्यात अनेक नवीन गोष्टी केल्या. ती कधीच तिच्या नात्याबद्दल मीडियासमोर बोलत नाहीत, पण आता मलायकाने एका इव्हेंटमध्ये याबद्दल मोकळेपणाने भाष्य केले आहे. खान कुटुंबापासून विभक्त झाल्यानंतर तिचे आयुष्य कसे बदलले ते सांगितले आहे.



# ‘मेग-एलिसची’ धडाकेबाज फलंदाजी!

## 9 षटकातच 110 धावांचं लक्ष्य गाठलं, मुंबईचा सलग दुसरा पराभव

।मुंबई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**नवी मुंबईच्या डी वाय पाटील स्टेडियममध्ये मुंबई इंडियन्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात महिला प्रीमियर लीगचा १८ वा सामना झाला. दिल्लीने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर मैदानात उतरलेल्या मुंबईच्या फलंदाजांची दिल्लीच्या गोलंदाजांनी पुरती दमछाक केली. मारिझान कापने भेदक गोलंदाजी करून मुंबईच्या सलामीवर फलंदाज यास्तिका भाटिया आणि हेली मॅथ्यूजला स्वस्तात माघारी पाठवलं. त्यानंतर सिवर ब्रंट,अमेलिया केरलाही धावांचा सूर गवसला नाही.**



पूजा वस्त्रकर, वॉंग आणि कर्णधार हरमप्रीतच्या सावध खेळीमुळं मुंबईची धावसंख्या शंभरी पार झाली अन् दिल्लीला १०७ धावांचं आव्हान मिळालं. या धावांचं लक्ष्य गाठण्यासाठी दिल्लीने मुंबईच्या गोलंदाजांचा धुव्वा उडवला आणि या सामन्यात एकतर्फी विजय मिळवला. शफाली वर्माने सुरुवातीलाच स्फोटक फलंदाजी केली. शफालीने १५ चेंडूत ३३ धावा कुटल्या. तर कर्णधार मेग लॅनिंग आणि एलिस केपसीनेही आक्रमक खेळी करत दिल्लीला विजयाच्या दिशेनं नेलं. मेगने २२ चेंडूत ३२ तर एलिसने १७ चेंडूत ३८ धावा कुटल्या. त्यामुळे दिल्लीने फक्त ९ षटकात ११० धावांचं लक्ष्य गाठून मुंबई इंडियन्सचा पराभव केला.दिल्ली कॅपिटल्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर मैदानात उतरलेल्या मुंबईच्या फलंदाजांवर दिल्लीने भेदक मारा केला. मारिझान कापने मुंबईच्या टॉप ऑर्डरच्या फलंदाजांना तंबूत पाठवलं. मारिझान काप, शिखा पांडे आणि जेस जोनासने प्रत्येकी दोन विकेट घेतल्या. मुंबईने २० षटकांत ८ बाद १०९ धावाच केल्या. त्यामुळे दिल्लीला विजयासाठी ११० धावांचं लक्ष्य गाठावं लागणार होतं.

यास्तिका भाटिया फक्त १ धाव करून तंबूत परतली. त्यानंतर हेलीही कापच्या गोलंदाजीवर बाद झाली. हेलीला १० चेंडूत फक्त ५ धावाच करता आल्या. कापने सिवर ब्रंटला भोपळाही फोडू दिला नाही. सिवर कापच्या गोलंदाजीवर शून्यावर बाद झाली.

### दिल्लीला विजयासाठी 110 धावांचं लक्ष्य

**मेगने २२ चेंडूत ३२ तर एलिसने १७ चेंडूत ३८ धावा कुटल्या. त्यामुळे दिल्लीने फक्त ९ षटकात ११० धावांचं लक्ष्य गाठून मुंबई इंडियन्सचा पराभव केला.दिल्ली कॅपिटल्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर मैदानात उतरलेल्या मुंबईच्या फलंदाजांवर दिल्लीने भेदक मारा केला. मारिझान कापने मुंबईच्या टॉप ऑर्डरच्या फलंदाजांना तंबूत पाठवलं. मारिझान काप, शिखा पांडे आणि जेस जोनासने प्रत्येकी दोन विकेट घेतल्या. मुंबईने २० षटकांत ८ बाद १०९ धावाच केल्या. त्यामुळं दिल्लीला विजयासाठी ११० धावांचं लक्ष्य गाठावं लागणार होतं.**

# वेलिंग्टन कसोटीत श्रीलंकेचा 4 दिवसांत पराभव!

## न्यूझीलंडने केला क्लीन स्वीप, निकल्सने नाबाद 200 धावा केल्या

। मुंबई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**न्यूझीलंड आणि श्रीलंका यांच्यातील वेलिंग्टन कसोटी चार दिवसांत संपली. वेलिंग्टन येथील दुसऱ्या कसोटीत यजमान किवींने श्रीलंकेचा एक डाव आणि 58 धावांनी पराभव केला. यासह त्याने 2 कसोटी मालिकेत क्लीन स्वीप केला. वेलिंग्टनमध्ये न्यूझीलंडने श्रीलंकेला फॉलोऑन करण्यास भाग पाडले, ज्यावर पाहुण्या संघाला मात करता आली नाही आणि सामना गमावला. याआधी क्राइस्टचर्च कसोटीत श्रीलंकेचा न्यूझीलंडकडून 1 धावांनी पराभव झाला होता.**



न्यूझीलंडने वेलिंग्टन कसोटीत प्रथम फलंदाजी केली आणि पहिल्या डावातच 580 धावा केल्या. 8 विकेट्स गमावून ही धावसंख्या उभारल्यानंतर न्यूझीलंडने पहिला डाव घोषित केला. न्यूझीलंडला पहिल्या डावात मोठी धावसंख्या गाठेपर्यंत केन विल्यमसन आणि हेन्री निकोल्सचा मोठा हात होता.

यात केन विल्यमसनच्या 215 धावांचे योगदान होते. 240 चेंडूंचा सामना करताना हेन्री निकल्सने नाबाद 200 धावा केल्या. दोघांमध्ये 350 हून अधिक धावांची भागीदारी झाली, ज्यामुळे किवी संघासाठी हे काम सोपे आणि श्रीलंका संघ आणि त्यांच्या गोलंदाजांसाठी कठीण झाले.

न्यूझीलंड संघाने केलेल्या धावसंख्येला उत्तर देण्यासाठी श्रीलंका मैदानावर उतरला तेव्हा कर्णधार दिमुथ करुणारत्नेच्या 89 धावा असूनही त्यांचा पहिला डाव अवघ्या 164 धावांवर आटोपला. याचा बंपर फायदा किवी संघाला झाला. त्यांना मोठी आघाडी मिळाली, त्यानंतर त्याने श्रीलंकेला फॉलोऑन देण्याचा निर्णय घेतला. सामन्याच्या तिसऱ्या दिवसापर्यंत दुसऱ्या डावात श्रीलंकेच्या केवळ 2 विकेट्स पडल्या होत्या.

मात्र चौथ्या दिवशी ऑलआऊट होण्यापासून ते स्वत:ला वाचवू शकले नाहीत. श्रीलंकेचा संघ आपल्या दुसऱ्या डावात केवळ 358 धावाच करू शकला. अशाप्रकारे न्यूझीलंडच्या आघाडीपासून 58 धावा दूर राहिला. यजमानांनी हा सामना एक डाव आणि 58 धावांनी जिंकला. केन विल्यमसन हा न्यूझीलंडच्या फतेह मालिकेतील मालिकेतील सर्वोत्तम खेळाडू होता. तर सामनावीर म्हणून हेन्री निकल्सची निवड करण्यात आली.

# जागतिक महिला बॉक्सिंग स्पर्धेत घोडदौड

। नवी दिल्ली महाईन्यूज
। वृत्तसंस्था ।

**भारतीय महिला खेळाडूंची नवी दिल्ली येथे सुरू असलेल्या जागतिक महिला बॉक्सिंग स्पर्धेतील दमदार कामगिरी रविवारीही कायम राहिली. स्टार खेळाडू निखत झरीन व मनीषा माऊन या दोघींनी प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळवत पुढल्या फेरीत प्रवेश केला.**

गत जागतिक विजेती निखतच्या आक्रमक खेळासमोर अल्जेरियाची अव्वल मानांकित बाऊलम राऊमायसा हिचा निभाव लागला नाही. निखत हिने ५० किलो वजनी गटात राऊमायसा हिच्यावर ५-० असा विजय साकारला. निखतसमोर पुढील फेरीत मेक्सिकोच्या हिरेरा अल्वारेझ फातिमा हिचे आव्हान असणार आहे. निखतप्रमाणेच मनीषा हिनेही प्रतिस्पर्धी खेळाडूवर वर्चस्व गाजवले. मनीषा हिने ५७ किलो वजनी गटात ऑस्ट्रेलियाच्या टीना रहिमी हिच्यावर ५-० असा सहज विजय नोंदवला. हरियानाच्या २५ वर्षीय खेळाडूने २०२२ मध्ये झालेल्या जागतिक स्पर्धेमध्ये ब्रॉंझपदक पटकावले होते. आता पुढील फेरीत तिला तुर्कीच्या नूर तूरहान हिचा सामना करावा लागणार आहे ऑलिंपिक पदकविजेत्या खेळाडूंनीही रविवारी पुढे वाटचाल केली. २०१६ रिओ ऑलिंपिकमध्ये ब्रॉंझपदक जिंकणारी कोलंबियाची इनग्रीत वॅलेंसिया हिने ५० किलो वजनी गटात केनियाच्या नझीवा वॅरोनिका हिला पराभूत केले.

